# <u>जिल्हाधिकारी कार्यालय, सिंधुदुर्ग</u>

## <u>भरती प्रक्रिया 2014</u>

## <u>गट क संवर्गातील लिपीक-टंकलेखक व उपविभागीय अधिकारी सावंतवाडी व कणकवली यांचे आस्थापनेवरील तलाठी भरतीसाठी जाहिरात</u>

क्रमांक : ESTT-2702/1/2014 दिनांक 16 मे, 2014

महसूल व वन विभागाकडील शासन निर्णय क्रमांक पदभरती 2013/प्र.क्र.147/ई-10, दिनांक 29.04.2014 अन्वये लिपीक-टंकलेखक व तलाठी संवर्गातील पदे भरण्यासाठी सामान्य प्रशासन विभागाकडील समितीने मान्यता दिली असून लिपीक-टंकलेखक संवर्गातील गट ड मधून पदोन्नतीची पदे भरण्यास देखील मान्यता दिलेली असल्याचे कळविलेले आहे. तसेच मागासवर्गिय अनुशेष, अपंग अनुशेष भरण्यास सामान्य प्रशासन विभागाकडील दिनांक 28.02.2013 रोजीचे शासन निर्णयाव्दारे सूट देण्यात आलेली आहे.

सबब उपरोक्त शासन निर्णयातील तरतुदींचे अनुषंगाने जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग यांचे आस्थापनेवरील गट क मधील लिपीक-टंकलेखक व तलाठी (उपविभागीय अधिकारी यांच्या आस्थापनेवरील) पदांवर सरळ सेवेने निवड करण्याकरीता इच्छुक व पात्र उमेदवारांकडून जिल्हा निवड समितीमार्फत या जाहीरातीव्दारे **<u>दिनांक 28.05.2014 रोजी सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग यांच्या कार्यालयीन अधिकृत संकेतस्थळावर (www.sindhudurg.gov.in) विहीत नमुन्यातील फक्त ONLINE अर्ज मागविण्यात येत आहेत</u>**. अर्जदाराने ONLINE अर्ज भरताना वस्तुनिष्ठ व अचूक माहिती भरावी. ONLINE भरलेल्या माहितीचे आधारे (मूळ कागदपत्र तपासणीच्या अधीन राहून) उमेदवाराची गुणवत्तेनुसार निवड करण्यात येईल. तसेच निवड केल्यानंतर उमेदवाराने पुरविलेली माहिती चुकीची/खोटी/दिशाभूल करणारी असल्याचे आढळल्यास, त्याची निवड रद्द करण्यात येईल व गुणवत्तेनुसार पुढील उमेदवारास संधी देण्यात येईल. उमेदवाराने ONLINE अर्ज करताना आपल्या शैक्षणिक व इतर बाबींची पूर्ण माहिती नमूद करावी. ONLINE भरलेल्या माहितीच्या व्यतिरीक्त इतर गुणवत्ता व माहितीची प्रमाणपत्रे/कागदपत्रे नंतर कोणत्याही परिस्थितीत विचारात घेतली जाणार नाहीत याची विशेष नोंद घ्यावी.

| पदाचे नांव | प्रवर्ग | पद संख्या | समांतर आरक्षण | | | | | | समांतर आरक्षण विरहीत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | माजी सैनिक | अंश कालीन | महिला | प्रकल्प ग्रस्त | भूकंप ग्रस्त | खेळाडू | |
| लिपीक-टंकलेखक | अ.जा. | 5 | 1 | 1 | 0 | 1 | 0 | 0 | 2 |
| | अ.ज. | 2 | 0 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 1 |
| | विजा अ | 2 | 0 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 1 |
| | भ.ज. ब | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 |
| | भ.ज. क | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 |
| | भ.ज. ड | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | विमाप्र | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 |
| | इमाव | 11 | 2 | 1 | 3 | 0 | 0 | 0 | 5 |
| | खुला | 27 | 5 | 3 | 0 | 1 | 0 | 1 | 17 |
| | अपंग | 1 | श्रवण शक्तीतील दोष | | | | | | 1 |
| | **एकूण** | **51** | **8** | **7** | **3** | **2** | **0** | **1** | **30** |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| तलाठी | अ.जा. | 6 | 2 | 2 | 0 | 0 | 0 | 0 | 2 |
| | अ.ज. | 3 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 3 |
| | विजा अ | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 |
| | भ.ज. ब | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | भ.ज. क | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | भ.ज. ड | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | विमाप्र | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | इमाव | 7 | 3 | 0 | 1 | 0 | 0 | 0 | 3 |
| | खुला | 3 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 3 |
| | **एकूण** | **20** | **5** | **2** | **1** | **0** | **0** | **0** | **12** |

1) **जाहिरातीत नमुद केलेल्या पदांच्या संख्येत वाढ अगर घट झाल्यास, रिक्त पदांच्या संख्येत बदल करण्याबाबत त्याचप्रमाणे सामाजिक / समांतर आरक्षण बदलण्याचे अधिकार पूर्णपणे जिल्हा निवड समिती, सिंधुदुर्ग यांना रहातील. याबाबत कोणताही वाद उपस्थित करता येणार नाही.**

2) **लिपीक-टंकलेखक व तलाठी संवर्गात रिक्त होणारी संभाव्य पदे विचारात घेण्यात आली असून सदरची पदे रिक्त झाल्यानंतर निवड केलेल्या यादीतील उमेदवारांना गुणवत्तेनुसार, तसेच सामाजिक/समांतर आरक्षणनिहाय जशी पदे रिक्त होतील त्याप्रमाणे नियुक्तीसाठी शिफारस करण्यात येईल.**

3) **मा.सहाय्यक आयुक्त (मावक), कोकण विभाग यांचेकडील तपासणीस अधीन राहून बिंदूनामावलीनुसार रिक्त पदे दर्शविण्यात आलेली आहेत. त्यांच्या तपासणीच्या अनुषंगाने आरक्षणात बदल संभवतात याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.**

01) <u>टिप सर्व पदांसाठी</u>

1. अतिरिक्त संवर्ग, आंतरविभागीय समायोजन, विभागीय बदली व इतर विभागातील पदांचा आढावा इत्यादी व अन्य कारणामुळे पदसंख्येत ( पदसंख्या कमी किंवा जास्त होणे ) व आरक्षण/समांतर आरक्षणामध्ये बदल होण्याची शक्यता आहे.

2) नियुक्ती देण्याच्या नियमात, पदसंख्येत/आरक्षणात बदल करणे, परीक्षा रद्द करणे, परीक्षा कोणत्याही टप्प्यावर स्थगित करणे, बदल करणे याबाबतचे अधिकार अध्यक्ष, जिल्हा निवड समिती तथा जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग यांना राहतील. याबाबत कोणताही वाद उपस्थित करता येणार नाही.

3. शासनाने भरतीबाबत/नियुक्तीबाबत वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय, परिपत्रक, आदेश इत्यादी भरती प्रक्रियेला लागू राहतील.

4. अर्जदार हा महाराष्ट्र राज्याचा अधिवासी / रहिवासी असावा. वरील पदासाठी आवश्यक अर्हता प्राप्त करणारा महाराष्ट्र राज्यातील कोणताही उमेदवार अर्ज करु शकतो.

02) <u>वेतनश्रेणी</u>

1. **लिपीक-टंकलेखक संवर्ग** - वेतनश्रेणी रुपये 5200-20200 (पी.बी.1)ग्रेड पे रु. 1900 अधिक नियमानुसार देय भत्ते.
2. **तलाठी संवर्ग** - वेतन श्रेणी रुपये 5200-20200 (पी.बी.- 1) ग्रेड पे रुपये 2400 अधिक नियमानुसार देय भत्ते.

03) <u>पात्रतेच्या अटी</u>

1. वयोमर्यादा - ( दिनांक 16.05.2014 रोजीची गणली जाईल )

2. उमेदवाराचे वय किमान 18 वर्षे व 33 वर्षापेक्षा (मागासवर्गीयांसाठी 38 वर्षे) यापेक्षा जास्त नसावे. तसेच ते शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयाप्रमाणे राहिल.

3. उच्च वयोमर्यादा खालील बाबतीत शिथिलक्षम आहे. खालील समांतर आरक्षणातील व या जाहिरातीतील मसुद्यात नमूद प्रवर्गातील उमेदवार अर्ज करु शकतात.

अ) अपंग, प्रकल्पग्रस्त व भूकंपग्रस्त उमेदवारांकरीता 45 वर्षापर्यंत.

ब) स्वातंत्र्य सैनिकांचे नामनिर्देशित पाल्य, सन 1991 चे जनगणना कर्मचारी, सन 1994 नंतरचे निवडणूक कर्मचारी उमेदवारांचे वय 45 वर्षे पेक्षा जास्त नसावे.

क) माजी सैनिक उमेदवाराच्या सशस्त्र दलातील सेवेइतका कालावधी अधिक 3 वर्षे इतकी राहील.

ड) पदवीधर अंशकालीन उमेदवारांकरीता 46 वर्षे

ई) खेळाडू गुणवत्ता व पात्रता विचारात घेऊन सदर पदासाठी असलेल्या वयोमर्यादेत 5 वर्षापर्यंत वयाची अट शिथीलक्षम राहील.

04) <u>शैक्षणिक अर्हता</u> ( दिनांक 16.05.2014 रोजी अथवा त्यापूर्वी पूर्ण केली असली पाहीजे )

| पदाचे नांव | शैक्षणिक अर्हता |
|---|---|
| लिपीक-टंकलेखक | 1. माध्यमिक शालांत परीक्षा (एस.एस.सी.) उत्तीर्ण |
| | 2. इंग्रजी टंकलेखनाची एका मिनिटाला 40 शब्द किंवा मराठी टंकलेखनाची एका मिनिटाला 30 शब्द या गतीची शासकीय वाणिज्य मंडळाची प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण. |
| | 3. मराठी, हिंदी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक राहील. |
| तलाठी | 1. संविधानिक विदयापीठाची पदवी, तसेच शासनाने त्यांचेशी समतूल्य म्हणून जाहीर केलेली अन्य अर्हता |
| | 2. मराठी, हिंदी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक राहील. |

05) <u>अतिरिक्त शैक्षणिक अर्हता</u>

उमेदवारास विभागीय परीक्षा, तसेच हिंदी व मराठी परीक्षा तत्संबंधी नियमानुसार परीक्षा पूर्वीच उत्तीर्ण झाला नसल्यास किंवा त्या उत्तीर्ण होण्यातून सुट देण्यात आली नसल्यास त्याला/ तिला परीक्षा विहीत मुदतीत उत्तीर्ण होणे अनिवार्य असेल.

06) <u>संगणक अर्हता</u>

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, निर्णय क्रमांक प्रशिक्षण-2000/प्र.क्र.61 2001/39, दिनांक 19 मार्च, 2003 नुसार नव्याने नियुक्तीसाठी D.O.E.E.A.C. सोसायटीच्या अधिकृत C.C.C. किंवा O स्तर A किंवा B किंवा C स्तर पैंकी कोणतीही एक परिक्षा उत्तीर्ण किंवा महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांचेकडील अधिकृत एमएस-सीआयटी परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक किंवा सदरची परीक्षा उत्तीर्ण नसल्यास नियुक्तीच्या दिनांकापासून दोन (2) वर्षाच्या आत धारण करणे आवश्यक राहील.

07) <u>परीक्षेचे स्वरुप</u>

1. <u>लिपीक-टंकलेखक पदाकरीता</u> : कमीत कमी अर्हता माध्यमिक शालांत परीक्षा ( इयत्ता 10 वी.) उत्तीर्ण आहे. अशा पदाकरीता परीक्षेचा दर्जा महाराष्ट्र राज्यातील माध्यमिक शालांत परीक्षेच्या दर्जाच्या समान असेल व लेखी परीक्षेला मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान व अंकगणित या विषयांवरील प्रश्नाकरीता प्रत्येकी 50 गुण ठेवून एकूण 200 गुणांची लेखी परीक्षा घेण्यात येईल. प्रश्नपत्रिका वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपाची असेल.

2. <u>तलाठी पदाकरीता</u> : कमीत कमी अर्हता पदवी आहे. अशा पदाकरीता परीक्षेचा दर्जा भारतातील मान्यता प्राप्त विदयापीठाच्या पदवी परीक्षेच्या दर्जाच्या समान राहील. परंतू मराठी या विषयाच्या प्रश्नपत्रिकेचा दर्जा उच्च

माध्यमिक शालांत परीक्षेच्या (इयत्ता 12 वी) दर्जाच्या समान राहील व लेखी परीक्षेला मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान व बौध्दीक चाचणी या विषयावरील प्रत्येकी 50 गुण असे एकूण 200 गुणांची लेखी परीक्षा घेण्यात येईल. प्रश्नपत्रिका वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपाची असेल.

3 सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्रमांक प्रानिमं-2007/प्र.क्र.46/07/13-अ, दिनांक 27.06.2008 मधील मुद्दा 5 नुसार गुणवत्ता यादीत अंतर्भाव करण्यासाठी उमेदवाराने एकूण गुणांच्या किमान 45 टक्के गुण प्राप्त करणे आवश्यक राहील.

4 लिपीक-टंकलेखक / तलाठी पदासाठी उमेदवारांची निवड करताना मुलाखती न घेता फक्त लेखी परीक्षा घेऊन लेखी परीक्षेमध्ये उमेदवारांनी प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे गुणवत्तेनुसार निवड यादी तयार करुन निवड यादीतील उमेदवारांची गुणवत्तेनुसार निवड करण्यात येईल.

5 शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक प्रानिमं-2010/209/प्र.क्र.66/10/13-अ, दिनांक 19 जून, 2010 अन्वये उमेदवारांनी उत्तरे लिहीण्यासाठी अथवा चिन्हांकीत करण्यासाठी फक्त काळया शाईचा बॉलपेनचा वापर करण्याचा आहे. अन्य कोणत्याही साधनाचा वापर केल्यास संबंधित उत्तरपत्रिका तपासली जाणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

08) 01) i) शासन निर्णय क्र.रिपभ/प्र.क.66/2011/ई-10, दि.27 जून 2011 नुसार ज्या परीक्षार्थीकडे अधिवास प्रमाणपत्र (**Domicile Certificate**) उपलब्ध नसल्यास त्यांनी त्यांचा जन्म महाराष्ट्र राज्यात झाला असल्याचा जन्मदाखला (**Birth Certificate**) सादर करणे आवश्यक आहे. अशा प्रकरणात अधिवास प्रमाणपत्राची अट लागू रहाणार नाही.

(ii) सदर परीक्षार्थीकडे अधिवास प्रमाणपत्र तसेच जन्मतारखेचा दाखला उपलब्ध नसल्यास, त्या परीक्षार्थीने आपला शाळा सोडल्याचा दाखला सादर करणे आवश्यक राहील. परंतू सदर शाळा सोडल्याच्या दाखल्यामध्ये त्या परीक्षार्थीचा जन्म महाराष्ट्र राज्यात झाला असल्याची नोंद असणे आवश्यक आहे. अशा प्रकरणात देखील अधिवास प्रमाणपत्राची आवश्यकता असणार नाही.

(iii) उपरोक्त बाबी फक्त महाराष्ट्र राज्यात जन्म झालेल्या परीक्षार्थीसाठी लागू राहतील. इतर परीक्षार्थी/ उमेदवारांसाठी अधिवास प्रमाणपत्र (**Domicile Certificate**) आवश्यक राहील.

02) उमेदवाराने अर्ज केला अथवा विहीत अर्हता धारण केली म्हणजे परीक्षेला बोलावण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे नाही.

03) प्राथमिक छाननीअंती ज्या उमेदवारांचे अर्ज नाकारण्यात आलेले नाहीत, अशा उमेदवारांना लेखी परीक्षेसाठी तात्पुरता प्रवेश दिला जाईल.

04) उमेदवारांना लेखी परीक्षेसाठी स्वखर्चाने यावे लागेल.

05) एखादया अर्जदाराने त्याची निवड करण्यासाठी निवड समितीवरील अध्यक्ष, सदस्य तसेच अधिका-यांवर प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष राजकीय अथवा अन्य प्रकाराने दबाव आणल्यास अथवा गैरप्रकाराचा अवलंब केल्यास त्यास निवड प्रक्रियेतून अपात्र ठरविण्यात येईल.

06) नियुक्ती होणा-या उमेदवारास शासन निर्णय दिनांक 1 नोव्हेंबर, 2005 नुसार लागू करण्यात आलेली अंशदायी निवृत्तीवेतन योजना लागू राहील.

07) शासन, सामान्य प्रशासन विभागाकडील निर्णय क्रमांक बीसीसी-2011/प्र.क्र.164/2011/16-ब, दिनांक 12.12.2011 अन्वये मागासवर्गिय उमेदवारांनी नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून 6 महिन्याच्या आत आपल्या जात/जमाती प्रमाणपत्राची वैधता संबंधित जात पडताळणी समितीकडून करुन घेणे बंधनकारक आहे.

08) अंतिम निवड यादीत व प्रतिक्षा यादीत निवड झालेल्या उमेदवारांनी पात्रतेबाबत सादर करावयाची कागदपत्रे

(i) उमेदवार ज्या समांतर आरक्षणामधून अर्ज करीत असेल त्या समांतर आरक्षणाबाबतचे सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

(ii) शासन महिला व बालविकास विभागाकडील निर्णय क्र.82/2001 म.से.आ.2000/प्र.क्र.415/का-2, दिनांक 25.05.2001 अन्वये खुला, विजाअ, भ.ज.ब., भ.ज.क., भ.ज.ड., विमाप्र, व इ.मा.व. या प्रवर्गातील महिला उमेदवारांची राखीव व बिनराखीव पदांसाठी निवड झाल्यास उन्नत व प्रगत व्यक्ती व गट यामध्ये मोडत नसलेबाबतचे सक्षम अधिकारी यांचे दिनांक 31.03.2014 या दिनांकापर्यंत वैध असलेले नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

(iii) महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम 2005 अन्वये शासनाने गट अ, ब, क, व ड मधील कोणत्याही पदांच्या सरळ सेवाप्रवेशासाठी एक आवश्यक अर्हता म्हणून विहीत नमुन्यातील (नमुना अ) लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र अर्जासोबत सादर करणे बंधनकारक आहे. सदरचे प्रतिज्ञापत्र अर्जासोबत प्राप्त न झाल्यास संबंधित उमेदवाराचा अर्ज अपात्र करण्यात येईल. अविवाहीत उमेदवारांनीसुध्दा प्रतिज्ञापत्रात अविवाहीत असल्याचे नमूद करुन प्रतिज्ञापत्रातील इतर आवश्यक तो (लागू असलेला) मजकूर भरुन अर्जासोबत सदर प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक आहे.

(iV) शैक्षणिक अर्हता, वय, अनुभव, अधिवास दाखला, टंकलेखन प्रमाणपत्र, जातीचा दाखला, उपलब्ध असल्यास जात वैधता प्रमाणपत्र, अ.ज./अ.जा. उमेदवार/अर्जदार वगळून इतरांसाठी उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबत प्रमाणपत्रांच्या सांक्षांकीत प्रती छाननीचे वेळी सादर करणे आवश्यक आहे. साक्षांकीत प्रती केंद्र/राज्य शासनाचे राजपत्रित अधिकारी, पोस्टमास्तर, मुख्याध्यापक व याबाबत प्राधिकृत व सक्षम अधिका-यांनी केलेले असावे. तसे नसल्यास किंवा चुकीची माहिती असल्यास आपली निवड रद्द समजण्यात येईल.

(V) उमेदवार माजी सैनिक असल्यास त्यांनी जिल्हा सैनिक बोर्डात नाव नोंदणी केली असल्यास प्रमाणपत्राची प्रत छाननीचे वेळी सादर करणे आवश्यक आहे.

09) निवड यादीमधील पात्र उमेदवारांनी सादर केलेल्या विविध प्रमाणपत्रांच्या साक्षांकीत प्रती मूळ प्रमाणपत्रांच्या आधारे कागदपत्रे तपासणीच्यावेळी तपासण्यात येतील. सदर प्रमाणपत्रांच्या मूळ प्रती कागदपत्रे तपासणीच्यावेळी उपलब्ध करुन देणे उमेदवारावर बंधनकारक राहील. त्यामधील प्रमाणपत्रे खोटी किंवा चुकीची आढळल्यास संबंधित उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल.

10) निवड समितीने तयार केलेले निवडसूची 1 वर्षासाठी किंवा निवडसूची तयार करताना ज्या दिनांकापर्यंतची रिक्त पदे विचारात घेण्यात आलेली आहेत, त्या दिनांकापर्यंत, जे नंतर घडेल त्या दिनांकापर्यंत विधीग्राह्य ठरेल. त्यानंतर ही निवडसूची व्यपगत होईल.

<u>परीक्षा शुल्काची आकारणी व शुल्क भरणा प्रक्रिया</u>

सदर भरती प्रक्रियेत खालीलप्रमाणे शुल्क आकारले जाणार असून सदर परीक्षा शुल्क हे ना परतावा राहील.

| अ.क्र. | पदाचे नांव | आवश्यक परीक्षा शुल्क | |
|---|---|---|---|
| | | खुला प्रवर्ग | मागास प्रवर्ग (राखीव प्रवर्ग) |
| 1 | लिपीक-टंकलेखक | 300 | 200 |
| 2 | तलाठी | 300 | 200 |

1. माजी सैनिकांसाठी परीक्षा शुल्क नाही. मात्र त्यासाठी त्यांनी सैनिकी सेवेचा पदावधी पूर्ण केल्याबाबतच्या कार्यमुक्त पत्राची साक्षांकीत प्रत स्कॅन करुन ऑनलाईन उपलोड करणे बंधनकारक आहे. सदर कार्यमुक्त पत्राची प्रत सादर न केल्यास वर नमूद केल्याप्रमाणे परीक्षा शुल्क भरणे आवश्यक राहील.

2. सदर शुल्क हे बॅक प्रोसेसिंग चार्जेस वगळून आहे. (बॅंक प्रोसेसिंग शुल्क रु.60/- वरील शुल्काशिवाय भरावे लागेल.

3. उक्त परीक्षा शुल्क हे भारतीय स्टेट बॅंकेच्या कोणत्याही शाखेत ऑनलाईन अर्ज भरताना प्राप्त झालेल्या विहीत चलनाव्दारेच रोखीने भरणे आवश्यक आहे.

4. या कार्यालयाचे अधिकृत संकेतस्थळ www.sindhudurg.gov.in वर ऑनलाईन अर्जात प्राथमिक माहिती भरल्यानंतर भारतीय स्टेट बॅंकेत शुल्क भरण्याबाबतचे चलन दोन प्रतीमध्ये (उमेदवाराची प्रत, बॅंकेची प्रत) उपलब्ध होईल. सदर चलनाची प्रिंट काढून त्या चलनामार्फतच उमेदवाराने चलनात नमूद असलेले आवश्यक ते शुल्क भारतीय स्टेट बॅंकेच्या कोणत्याही शाखेमध्ये पुढील कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी भरावे. उमेदवाराने आवश्यक शुल्क भरल्याची खात्री झाल्यानंतर उमेदवारास पुढील परिपूर्ण अर्ज भरता येईल. उमेदवाराने त्यांना देण्यात आलेला लॉग इन आयडी **(Login ID)** व पासवर्ड टाकून अर्ज पूर्ण भरावा.

5. भारतीय स्टेट बॅंकेच्या कोणत्याही शाखेमध्ये परीक्षा शुल्क भरणेचा कालावधी **दिनांक** 19.05.2014 **ते दिनांक** 29.05.2014 पर्यंत राहील. त्यानंतर बॅंकेत परीक्षा शुल्क भरणा-या उमेदवारांचा विचार केला जाणार नाही.

<u>ऑनलाईन अर्ज करावयाची कार्यपध्दती व इतर सूचना</u>

1. उमेदवाराने संपूर्ण जाहीरात काळजीपूर्वक वाचावी.

2. ज्या पदासाठी उमेदवार ऑनलाईन अर्ज भरणार आहे त्या पदाची शैक्षणिक पात्रता, त्यासाठी आवश्यक वयोमर्यादा व इतर अनुषंगिक माहिती जाहीरातीमध्ये काळजीपूर्वक वाचावी.

3. सदर परीक्षेसाठी अर्ज फक्त ऑनलाईन पध्दतीनेच स्वीकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारले जाणार नाहीत. कोणत्याही उमेदवाराने इतर कोणत्याही प्रकारे या कार्यालयास अर्ज सादर केल्यास सदर अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत. तसेच यापूर्वी अर्ज सादर केला असल्यास त्याची दखल घेतली जाणार नाही व त्या अर्जास या कार्यालयाकडून कोणत्याही प्रकारचे उत्तर देखील दिले जाणार नाही. या संदर्भात कोणत्याही उमेदवाराच्या तक्रारीची या कार्यालयाकडून दखल घेतली जाणार नाही.

4. सर्व पात्र उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज या कार्यालयाच्या www.sindhudurg.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर **दिनांक** 19.05.2014 **ते दिनांक** 28.05.2014 या कालावधीत सादर करणे आवश्यक राहील. ऑनलाईन अर्ज स्वीकारण्याच्या अंतीम दिनांक व वेळेनंतर संकेतस्थळावरील अर्ज भरण्याची लिंक बंद करण्यात येईल.

5. उमेदवारांचे अर्ज ऑनलाईन पध्दतीने स्वीकारण्यात येणार असल्याने अर्ज करताना शैक्षणिक कागदपत्रे वा अन्य कोणतेही शैक्षणिक अर्हतेबाबतचे प्रमाणपत्र जोडण्याची आवश्यकता नाही. तथापी ऑनलाईन अर्जामध्ये उमेदवाराने त्याच्या पात्रतेनुसार काळजीपूर्वक संपूर्ण व खरी माहिती भरणे आवश्यक आहे. ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरताना काही चूका झाल्यास किंवा त्रुटी राहील्यास व भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्ज नाकारला गेल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील. व याबाबत उमेदवारास कोणत्याही प्रकारची तक्रार करता येणार नाही. ऑनलाईन अर्जात भरलेली माहिती बदलता येणार नाही. जाहीरातीत नमूद केलेल्या सर्व अटी, तसेच शैक्षणिक अर्हता व मागणीनुसार आरक्षण, वयोमर्यादा शिथिलीकरण वगैरेची पात्रता तपासूनच अर्ज सादर करावा.

6. उमेदवाराने ऑनलाईन अर्ज भरतेवेळी सर्व आवश्यक कागदपत्रे व स्वत:चा अलीकडच्या काळातील पासपोर्ट फोटो स्वत: जवळ असल्याची खात्री करावी. अर्ज भरतेवेळी फोटो व सही स्कॅन करुन संकेतस्थळावरील

सूचनेनुसार अपलोड करणे आवश्यक राहील.  ऑनलाईन अर्ज अचूक भरणेची जबाबदारी अर्जदार यांची राहील व त्याअनुषंगाने कोणतीही तक्रार नंतर विचारात घेतली जाणार नाही.

7. जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्रात नाव नोंदणीकेली असली तरी देखील वरील पदांसाठी रितसर ऑनलाईन अर्ज अधिकृत संकेतस्थळावर करणे, परीक्षास शुल्क बँकेत भरणे आवश्यक आहे.

8. ऑनलाईन अर्ज भरताना उमेदवाराजवळ स्वत:चा वापरात असलेला ई-मेल आयडी असणे आवश्यक आहे.

9. उमेदवाराने अर्जासोबत माहिती सादर करताना कार्यान्वीत असलेला भ्रमणध्वनी (मोबाईल) क्रमांक व ई-मेल आयडी नमूद करावा, जेणेकरुन आपणास संपर्क करुन आवश्यक ती माहिती देणे सुलभ होईल. उमेदवारांनी ऑनलाईन अर्जाव्दारे नोंदविलेला भ्रमणध्वनी व ई-मेल आयडी हा अपूर्ण अथवा चुकीचा असल्यास, तसेच मोबाईल क्रमांक NCPR Registered (DND**)** असल्यामुळे संपूर्ण भरती प्रक्रियेदरम्यान त्याव्दारे पाठविल्या जाणा-या सूचना, संदेश व माहिती उमेदवारांना प्राप्त न झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील,  तसेच याव्दारे संदेशवहनात येणा-या तांत्रिक अडचणींना अध्यक्ष, जिल्हा निवड समिती तथा जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग हे जबाबदार असणार नाहीत.  या कार्यालयाच्या अधिकृत संकेतस्थळावर भरती प्रक्रिये दरम्यान वेळोवेळी सूचना देऊन भरती प्रक्रियेच्या माहितीबाबत अदययावत रहाण्याची जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील.

10. ऑनलाईन पध्दतीने अर्ज परीपूर्ण भरल्यानंतर भारतीय स्टेट बँकेत शुल्क भरण्याबाबतचे चलन दोन प्रतीमध्ये (उमेदवाराची प्रत, बॅकेची प्रत) उपलब्ध होईल.  सदर चलनाची प्रिंट काढून त्या चलनामार्फतच उमेदवाराने चलनात नमूद असलेले आवश्यक ते शुल्क भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेमध्ये पुढील कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी भरावे.  बँकेत शुल्क भरल्यानंतर उमेदवाराने शुल्क नोंदीच्या स्थितीसह अर्ज अपडेट झाल्यावर उमेदवाराने आपला अर्ज पूर्ण भरु शकतील.  उमेदवाराने परिपूर्ण अर्ज भरल्यानंतर अर्जाची प्रिंट स्वत: काढावी व ती आपल्या माहितीसाठी जतन करुन ठेवावी.  **तसेच त्याची प्रत सर्व आवश्यक कागदपत्रांच्या साक्षांकीत प्रतीसह या कार्यालयास पोस्टाव्दारे पाठविण्याची व्यवस्था करावी. अर्जदाराने नियमितपणे संकेतस्थळाला भेट दयावी.**

11. पदासाठी आवश्यक असणारी किमान अर्हता व पात्रता धारण करणा-या व लेखी परीक्षेस पात्र ठरणा-या उमेदवारांना या पदासाठी घेण्यात येणारी परीक्षेची रुपरेषा, वेळापत्रक, प्रवेशपत्र, परीक्षा केंद्र व बैठक क्रमांक ई. बाबतची माहिती या कार्यालयाच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध राहील.

12. ज्या उमेदवारांनी ऑनलाईन नोंदणी केली आहे आणि आवश्यक आवेदन शुल्क मुदतीत अदा केले आहे व संपूर्ण माहिती भरुन प्रिंट काढली आहे, त्यांना लेखी परीक्षेचे प्रवेशपत्र (हॉल तिकीट) त्याच्या लॉग इन आयडी व्दारे अधिकृत संकेतस्थळावरुन प्राप्त करुन घेता  येईल.  यासाठी वेगळा पत्रव्यवहार केला जाणार नाही.

13. परीक्षा केंद्रावर ओळखपत्रासह परीक्षा सुरु होण्यापूर्वी एक तास अगोदर उपस्थित रहाणे आवश्यक आहे. उशीरा येणा-या व प्रवेशपत्र न आणणा-या उमेदवारांना परीक्षेकरीता प्रवेश दिला जाणार नाही.  तसेच उमेदवारांनी स्वत:चे फोटो असलेले ओळखपत्र उदा. वाहन परवाना, पॅन कार्ड, निवडणूक ओळखपत्र, आधार कार्ड, इ. सोबत आणणे बंधनकारक राहील.

14. पदभरतीच्या कार्यक्रमात नमूद केल्यानुसार उमेदवारांनी या कार्यालयाच्या अधिकृत संकेतस्थावरुन परीक्षेचे प्रवेशपत्र डाऊनलोड करुन घ्यावे.  कोणत्याही उमेदवारास पोस्टाने प्रवेशपत्र पाठविले जाणार नाही याची नोंद घ्यावी. तसेच प्रवेशपत्राशिवाय कोणत्याही उमेदवारास परीक्षेसाठी प्रवेश दिला जाणार नाही.

15. उमेदवारांना ऑनलाईन अर्ज भरण्यात काही अडचणी आल्यास त्यांनी 02362-228845 / 9028686300 या क्रमांकावर संपर्क साधावा.

16. अर्जामध्ये नमूद केलेली माहिती चुकीची अथवा खोटी आढळून आल्यास संबंधित उमेदवार कारवाईस पात्र राहील. तसेच चुकीच्या माहितीच्या आधारे नियुक्ती झाल्यास संबंधित उमेदवार तात्काळ सेवेतून काढून टाकणेस पात्र राहीलव भरतीय दंड संहितेच्या कलम 199 व 200(2) प्रमाणे कारवाईस पात्र राहील.

**<u>पदभरतीचा कार्यक्रम / वेळापत्रक</u>**

लिपीक-टंकलेखक आणि तलाठी पदभरतीचा कार्यक्रम खालीलप्रमाणे राहील. त्यामध्ये जिल्हा निवड समितीमार्फत काही बदल करावयाचा झाल्यास या कार्यालयाच्या www.sindhudurg.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येईल.

| अ.क्र. | भरती पक्रिया कार्यक्रम | संभावित दिनांक व वेळ | |
|---|---|---|---|
| | | लिपीक टंकलेखक पदासाठी | तलाठी पदासाठी |
| 1 | ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरण्याचा कालावधी | दिनांक 19.05.2014 रोजी सकाळी 11.00 वाजेपासून ते 28.05.2014 रोजी सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत | |
| 2 | भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेमध्ये विहीत चलनाव्दारे परीक्षा शुल्क जमा करण्याचा कालावधी | दिनांक 19.05.2014 ते दिनांक 29.05.2014 (भारतीय स्टेट बँकेच्या कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत) | |
| 3 | लेखी परीक्षेसाठी प्रवेशपत्र उपलब्ध होण्याचा कालावधी | दिनांक 03.06.2014 | दिनांक 17.06.2014 |
| 4 | लेखी परीक्षेचा दिनांक | दिनांक 08.06.2014 रोजी स.11.00 ते दु. 12.30 पर्यंत | दिनांक 22.06.2014 रोजी स. 11.00 ते दु. 12.30 पर्यंत |

जाहीरातीमध्ये दिलेल्या सूचना/निर्देश व शासन निर्णयात काही तफावत किंवा फरक असल्यास शासन निर्णय अंतिम रहातील याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

ठिकाण : सिधुदुर्गनगरी
दिनांक : 16.05.2014

( ई. रवींद्रन )
अध्यक्ष
जिल्हा निवड समिती तथा
जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग